**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ चा अतिरिक्त सरतपास – श्री. आर. आर. चव्हाण वकील.**

**१०.** आता मला वादी सोबत दिलेल्या करारनाम्याची प्रत दाखवली, तिला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलट तपास – श्री. जी. जे. पाटील वकील.**

**११.** माझे पाचवी पर्यंतचे शिक्षण झाले असून मला लिहिता– वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रातील मजकूर वकिलांना सांगितलेला नसून त्यावरती न वाचता स्वाक्षरी केली आहे. नाना विठोबा जाधव माझ्या वडिलांचे नाव आहे. त्यांना वादीचा वडिल हा एक भाऊ होता. माझे वडिल व चुलते कृष्णा हयात नाहीत. माझ्या वडिलांना मी व माझा भाऊ असे दोन मुले आहोत. माझे चुलते कृष्णा यांना वादीसह आणखीन चार मुले आहेत.

**१२**. न. भू. क्र.६७५ व ६७६ या आमच्या वडिलार्जित मिळकती आहेत. आमच्या वडिलांच्या निधनानंतर सदर मिळकतींना माझे व भाऊ सदाशिव याचे नाव लागले आहे. सदर मिळकतींच्या मी व भाऊ सदाशिवमध्ये झालेल्या वाटपा दरम्यान पुर्वेकडील अर्धी मिळकत सदाशिवला आणि पश्चिमेकडील अर्धी मिळकत मला मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीची वडिलार्जित न. भू. क्र.६७५ ची मिळकत ही न. भू. क्र.६७६ च्या पुर्वेला लागून आहे. न. भू. क्र.६७५ च्या पश्चिम बाजूला न. भू. क्र.६७६ मधील सदाशिवचा हिस्सा होता. वादीचा न. भू. क्र.६७५ हा त्याच्या वडिलांकडून त्याला वारसाने मिळालेला आहे. मला वादीने न. भू. क्र.६७५ मधील त्यांच्या भावांचे हिस्से विकत घेतल्याची माहिती नाही. मला वादीने माझा भाऊ सदाशिव याचा न. भू. क्र.६७६ मधील हिस्सा दि.०८.१२.२०२४ रोजी विकत घेतल्याची माहिती नाही. मला वादीने सदाशिवचे १३७.८ चौ. मी. क्षेत्र विकत घेतल्याची माहिती नाही.

**१३**. न. भू. क्र.६७६ मध्ये माझे निम्मे क्षेत्र असून सदाशिवचे निम्मे क्षेत्र होते. सदाशिवच्या निम्या क्षेत्रामध्ये जुने घर व त्यापुढे रिकामी जागा होती. माझ्या न. भू. क्र. ६७६ मधील हिस्याच्या पश्चिम बाजूच्या क्षेत्रात खुली जागा होती. मी व सदाशिवने केलेल्या वाटपामध्ये त्याला न. भू. क्र.६७६ च्या पुर्वेकडील जुने घर व त्यापुढे जागा

असलेली निम्मी जागा दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपा प्रमाणे सदाशिव त्या जागेचा मालक झाला होता.

**१४**. मला माझ्या आणि भाऊ सदाशिवच्या न. भू. क्र.६७६ मधील हिस्याच्या मिळकतीचा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक सांगता येणार नाही. मला माझ्या हिस्याच्या मिळकतीचे क्षेत्र किती आहे याबाबत माहिती नाही. मला न. भू. क्र.६७५ चे क्षेत्र ३८४.९ चौ. मी. असल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, न. भू. क्र.६७६ मधील अर्धे आणि न. भू. क्र.६७५ चे संपुर्ण क्षेत्र वादीच्या ताब्यात आहे.

प्रश्न – वादीने न. भू. क्र.६७५ व ६७६ मधील त्याच्या जागेत आर. सी. सी. घराचे बांधकाम केले आहे ?

उत्तर – वादीने सदाशिवच्या जागेत बांधकाम केलेले नाही.

**१५**. हे म्हणणे खरे आहे की, वादीने न. भू. क्र.६७६ च्या सदाशिवच्या हिस्याच्या पश्चिम बाजूला भिंत घातली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने त्या भिंतीचे बांधकाम माझ्या जागेच्या बाजूला एक फूट अंतर सोडून केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने तेथे २७.५ मि. उत्तर–दक्षिण लांबीची आणि एक फुट रुंदीची पूर्व–पश्चिम अशी खुली जागा ठेवली आहे.

**१६.** मला दावा मिळकतीच्या पुर्वेला कृष्णा आनंदा माने याची जागा असल्याची माहिती नाही. दावा मिळकतीच्या पश्चिमेला माझी जागा, दक्षिणेला बापू कोंडेकर व शिवाजी कोंडेकर यांची जागा आणि उत्तरेला ग्रामपंचायतीचा रस्ता आहे. माझा भाऊ सदाशिव २००७ साली मयत झाला आहे. त्याला पत्नी अनिता, अमोल आणि आशिष अशी दोन मुले आहेत. ते सर्व सदाशिव मयत झाल्यापासून वडकशिवाले येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, सदाशिवच्या हिस्याची शेतजमीन माझ्याकडे कसण्यासाठी आहे. मला न. भू. क्र.६७५ मध्ये वादी व त्याच्या भावांचा प्रत्येकी १/५ हिस्सा असल्याची माहिती नाही. मला त्या हिस्याची वादीने दस्त क्र.१३९९ ने खरेदी केल्याची माहिती नाही.

**१७**. मी सन २०१४ मधील जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात दावा मिळकतीच्या

भिंतीच्या पश्चिमेकडील जागेत साफसफाई केली होती. त्या भिंतीला लागून असलेले दगड व मातीचे ढीग मी साफ केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी साफसफाई करुन वादीच्या भिंतीचा पाया उघडा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे वादीची भिंत पडण्याचा धोका निर्माण झाला. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मुंबई वरुन आल्यावर दि.१६.०७.२०१४ रोजी वाद मिटवण्यासाठी माझ्याकडे मोजणीचा प्रस्ताव दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीने पाया का उघडा केला याबाबत विचारणा केल्यावर मी त्याला '*मी करणार, मला याबाबत विचारायचे नाही*' असे उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझ्यासोबत वस्तू क्र.अ प्रमाणे कोणताही करारनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझी गावातील तंटामुक्ती समितीकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या चौकशी दरम्यान समितीने मला व वादीला न. भू. क्र.६७५ व ६७६ ची मोजणी करायला सांगितली होती.

**१८.** मला दावा दाखल असताना वादीने सरकारी मोजणीसाठी अर्ज दिल्याची माहिती नाही. मी मोजणी झाल्याबाबत जबाब दिलेला नाही. मला मोहम्मद पठाण याने जागेवरती येऊन मोजणी केल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी दावा मिळकतीत ३६ चौ. मी. अतिक्रमण केल्याचे दर्शवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणी झाल्यावर माझा जबाब नोंदवलेला असून देखील मोजणी झाल्याचे व जबाब दिल्याचे नाकारत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला ३६ चौ. मी. अतिक्रमित जागा द्यावी लागू नये यासाठी खोटी कैफियत दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १३.०४.२०२६.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.